81

दै. पुढारी, दि. २४ एप्रिल १९९० पान आठ

# युगस्त्री ताराराणी स्मृत्यर्थ महिला विद्यापीठाची मागणी

आजरा, दि. २३ (वार्ताहर) : असामान्य कर्तृत्व गाजविलेल्या युगस्त्री ताराराणीचे स्मारक म्हणून कोल्हापुरात महिला विद्यापीठ स्थापन होण्याची गरज असून त्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत, शासनाने देखील याची वेळीच दखल घ्यावी अशी मागणी मौनी विद्यापीठाचे संस्थापक आणि ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष व्ही.टी. पाटील यांनी आजरा येथे अनौपचारिकरित्या बोलताना केली. या संदर्भात त्यांनी आपल्या आजरा भेटीत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

ताराराणीचे यथोचित स्मारक म्हणून आणि कर्तृत्ववान महिलांना पुढे येण्यास वाव मिळावा यासाठी हे महिला विद्यापीठ अत्यंत गरजेचे असून त्यासाठी सर्वांनीच सहकार्य करणे गरजेचे आहे. आपण आपल्या परीने साऱ्या शक्तीनिशी सहकार्य करण्याचे वचन बाबासाहेब पुरंदरे यांनी यावेळी दिले. सुमारे तासभर झालेल्या या चर्चेत व्ही.टी. पाटील यांनी आजपर्यंतच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याची माहिती दिली.

कोल्हापूर जिल्हावासियांनी शासकीय पातळीवर या महिला विद्यापीठासाठी प्रयत्न करावेत असेही श्री. पुरंदरे यावेळी म्हणाले.